# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

क्र.प्र.ले./वित्त/प्रकल्प/२४ दिनांक: १० .१०.२०१७

विषय: जीएसटी अंमलबजावणीनंतर महानगरपालिकेतील कंत्राटांत होणाऱ्या बदलाबाबत.

संदर्भ: १) शासन परिपत्रक क्र.जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१ दिनांक १९ ऑगस्ट, २०१७
२) प्र.ले./वित्त/प्रकल्प/शहर/१६ दिनांक ३१.०८.२०१७
३) प्र.ले./वित्त/प्रकल्प/शहर/१७ दिनांक ०६.०९.२०१७
४) शासन परिपत्रक क्र.जीएसटी-१०१७/प्र.क्र.१५५/कराधान-१ दिनांक ११सप्टेंबर, २०१७
५) प्र.ले./वित्त/प्रकल्प/शहर/१९ दिनांक १५.०९.२०१७

जीएसटीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने, उपरोक्त संदर्भिय परिपत्रकांन्वये मार्गदर्शक सूचना दिलेल्या असून त्यामध्ये अंशत: सुधारणा / काही नविन सुचना खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

१) ***प्रगतीपथावरिल कामे-*** उपरोक्त संदर्भ क्र.२ स्थित परिपत्रकामध्ये कंत्राटदारांच्या देयकांतून जीएसटीच्या अनुषंगाने १० टक्के रक्कम अनामत ठेवण्याचे सूचित केले आहे. त्याऐवजी आता ५टक्के रक्कम अनामत खाती (GL Code.340100122) ठेवण्यात यावी.

कंत्राटदाराकडून सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र जोपर्यंत सादर केले जात नाही तोपर्यंत कंत्राटदाराच्या देयकातून ५टक्के रक्कम अनामत खाती रोखून ठेवावी. तत्पूर्वी, कंत्राटदार सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र सादर करण्यास सहमत आहे याबाबतचे तसेच ५टक्के रक्कम रोखून ठेवण्यास कंत्राटदाराची हरकत नाही याबाबतचेही कंत्राटदाराकडून संमतीपत्र घेण्यात यावे. कंत्राटदाराने सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, GST-Anti Profiteering Measure च्या अनुषंगाने महापालिकेस येणे असलेली रक्कम, समायोजीत करून जर रक्कम शिल्लक राहत असेल, तर ती अनामत रक्कम कंत्राटदारास परत करावी. तथापि, जर कंत्राटदार सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र प्रत्येक देयकाच्या वेळी सादर करत असेल, तर त्यानुसार महापालिकेस येणे असलेली रक्कम त्या प्रत्येक देयकांमधून समायोजीत करण्यात यावी. अंतिम देयकाचे अधिदान करण्यासाठी कंत्राटदाराकडून सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे, केवळ त्यानंतरच कंत्राटदाराची ५टक्के अनामत रक्कम, कंत्राट सुरक्षा रक्कम (C.D.), रिटेंशन मनी (R.M.), बँक हमीपत्र (Performance.B.G.) कंत्राटदारास परत करण्याबाबतची विहित कार्यवाही करता येईल.

२) **नविन कामांबाबत:** कंत्राटदाराने कार्यादेश मिळाल्यापासून ६ महिन्यांच्या आत सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

कंत्राटदाराकडून सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र जोपर्यंत सादर केले जात नाही तोपर्यंत कंत्राटदाराच्या देयकातून ५टक्के रक्कम अनामत खाती रोखून ठेवावी. तत्पूर्वी, कंत्राटदार सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र सादर करण्यास सहमत आहे याबाबतचे तसेच ५टक्के रक्कम रोखून ठेवण्यास कंत्राटदाराची हरकत नाही याबाबतचेही कंत्राटदाराकडून संमतीपत्र घेण्यात यावे. कंत्राटदाराने सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, GST-Anti Profiteering Measure च्या अनुषंगाने महापालिकेस येणे असलेली रक्कम, समायोजीत करून जर रक्कम शिल्लक राहत असेल, तर ती अनामत रक्कम कंत्राटदारास परत करावी. तथापि, जर कंत्राटदार सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र प्रत्येक देयकाच्या वेळी सादर करत असेल, तर त्यानुसार महापालिकेस येणे असलेली रक्कम त्या प्रत्येक देयकांमधून समायोजीत करण्यात यावी. अंतिम देयकाचे अधिदान करण्यासाठी कंत्राटदाराकडून सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे, केवळ त्यानंतरच कंत्राटदाराची ५टक्के अनामत रक्कम, कंत्राट सुरक्षा रक्कम (C.D.), रिटेंशन मनी (R.M.), बँक हमीपत्र (Performance.B.G.) कंत्राटदारास परत करण्याबाबतची विहित कार्यवाही करता येईल.

३) **कार्यकारी मंजूरी प्राप्त झालेली कामे:** वरील संदर्भ क्र.२ स्थित परिपत्रकाच्या अनुषंगाने, ज्या निविदा रद्द करून पुन्हा निविदा मागविण्याबाबतचे निदेश देण्यात आलेले आहेत, अशा प्रकरणी जर, सदर कामांना सक्षम प्राधिकाऱ्याची/स्थायी समितीची कार्यकारी मंजूरी प्राप्त झालेली असेल आणि अशा कामांसाठी अद्याप पुनर्निविदा मागविण्यात आलेल्या नाहीत अशा कामांच्या निविदा रद्द न करता, Anti Profiteering Measures च्या अनुषंगाने कंत्राटदाराकडून Annexure – A प्रमाणे प्रतिज्ञापत्र (Irrevocable Undertaking) घ्यावे. तसेच कंत्राटदार सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र सादर करण्यास सहमत आहे असे संमतीपत्र घेण्यात यावे. त्याचप्रमाणे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र आणि ५ टक्के अनामत रक्कम, अंतिम देयक आणि कंत्राटदाराच्या इतर अनामत ठेवी व बँक हमीपत्रे परत करण्याबाबत उपरोक्त अनु. क्र.२ प्रमाणे कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे, संदर्भिय क्र.५स्थित परिपत्रकातील अनु क्र. ३-अ(अ ते इ) प्रमाणेही कार्यवाही करावी.

उपरोक्त सुचनां खेरीज महापालिकेच्या संदर्भिय परिपत्रकांतील अन्य सूचना कायम असुन सदर सुचनांची तसेच उपरोक्त सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत सर्व खातेप्रमुख /सहाय्यक आयुक्त /रुग्णालय अधिष्ठाता / वैद्यकिय अधिक्षक / उपप्रमुख लेखापाल/ लेखा अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

(रा.क.आव्हाड)
प्रमुख लेखापाल(पा.पु.म. नि:)

(प्रदिप पडवळ)
प्रमुख लेखापाल(वित्त) प्र.

(राम धस)
उपायुक्त (म.ख.खा.)

(सुधीर नाईक)
उपायुक्त (सामान्य प्रशासन)

(डॉ.संजय मुखर्जी)
अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

(अजोय मेहता)
महानगरपालिका आयुक्त